सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५

(दिनांक २६ जानेवारी, २०१६ पर्यंत सुधारित)

MAHARASHTRA ACT No. XXXIV OF 2006

# Maharashtra State Commission for Backward Classes Act, 2005

*(As modified upto the 26th January, 2016)*

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०१५

[ किंमत : .१९ रुपये ]

वि (जे) ६७०

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४

# महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५

## अनुक्रमणिका


उद्देशिका

कलमे — पृष्ठ

प्रकरण एक

प्रारंभिक

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | ... | १ |
| २. | व्याख्या. | ... | २ |

प्रकरण दोन

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | राज्य मागासवर्ग आयोग घटित करणे. | ... | २ |
| ४. | अध्यक्षपदस्थ व्यक्ती आणि सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती. | ... | ३ |
| ५. | आयोगाचे अधिकारी आणि अन्य कर्मचारी. | ... | ४ |
| ६. | मानधन, वेतन व भत्ते अनुदानातून देणे. | ... | ४ |
| ७. | रिक्त पदे, इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे. | ... | ४ |
| ८. | आयोगाने कार्यपद्धती विनियमित करणे. | ... | ४ |

प्रकरण तीन

आयोगाची कामे आणि अधिकार

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | आयोगाची कामे. | ... | ५ |
| १०. | आयोगाचे अधिकार. | ... | ५ |
| ११. | शासनाने सूचीचे नियतकालिक पुनरीक्षण करणे. | ... | ६ |

प्रकरण चार

वित्तव्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | शासनाकडून अनुदाने. | ... | ६ |
| १३. | लेखे व लेखापरीक्षा. | ... | ६ |
| १४. | वार्षिक अहवाल. | ... | ६ |
| १५. | वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळासमोर ठेवणे. | ... | ७ |




वि (जे) ६७०--१

## अनुक्रमणिका--*चालू*

### प्रकरण पाच

### संकीर्ण


| | | | |
|---|---|---|---|
| १६. | आयोगाची अध्यक्षपदस्थ व्यक्ती, सदस्य अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे. | ... | ७ |
| १७. | नियम करण्याचा अधिकार. | ... | ७ |
| १८. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. | ... | ८ |

# सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४

## [ महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ ]

[ मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक १४ ऑगस्ट २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. ]

### अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांव्यतिरिक्त इतर मागासवर्गांकरिता राज्यस्तरीय आयोग घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरिता अधिनियम

**ज्याअर्थी,** सर्वोच्च न्यायालयाने, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांखेरीज, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या इतर वर्गांसाठी नागरी पदे आणि सेवा आरक्षित ठेवण्यासंबंधातील मंडल आयोग प्रकरणाच्या निर्णयात सर्व राज्य सरकारांना, इतर बाबींबरोबरच, इतर मागासवर्गातील नागरिकांच्या सूचीमध्ये समावेश करण्यासंबंधीच्या विनंत्या तपासणे आणि त्याबाबत शिफारशी करणे, आणि त्या सूचीमध्ये जास्त प्रमाणात (over-inclusion) किंवा कमी प्रमाणात (under-inclusion) अंतर्भाव केल्याबद्दलच्या तक्रारी विचारार्थ स्वीकारणे यासाठी कायमस्वरूपी मंडळ घटित करण्याचे निदेश दिलेले होते ;

**आणि ज्याअर्थी,** सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वोक्त निदेशांचे अनुपालन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दिनांक १५ मार्च १९९३ च्या शासन निर्णयाद्वारे, उपरोक्त कामे पार पाडण्यासाठी महाराष्ट्र इतर मागासवर्ग समिती या नावाने एक समिती घटित केली होती, नंतर तिचे "राज्य मागासवर्ग आयोग" असे नामकरण करण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाला, उक्त आयोगास सांविधिक दर्जा देणे आणि त्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये आणि राज्यातील इतर स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणांतील सेवेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीखेरीज सामाजिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या वर्गांसाठी नियुक्ती किंवा पदे आरक्षित करण्याची सुनिश्चिती करण्याच्या उद्देशाने आयोग घटित करण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतूद करण्याकरिता एक सर्वसमावेशक कायदा अधिनियमित करणे इष्ट वाटते ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या छप्पन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ.**

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर :—

(क) "नियत दिवस" याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल तो दिवस, असा आहे ;

(ख) "महालेखापाल" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्याचा महालेखापाल असा आहे ;

(ग) "मागासवर्ग" याचा अर्थ, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांव्यतिरिक्त राज्य शासनाने सूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केले असतील असे, नागरिकांचे मागासवर्ग, असा आहे ;

(घ) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, असा आहे ;

(ङ) "सूच्या" याचा अर्थ, राज्य शासनाच्या मते, राज्य शासनाच्या किंवा राज्यातील किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही स्थानिक किंवा इतर प्राधिकरणाच्या सेवेत ज्यांचे पुरेसे प्रतिनिधित्व झालेले नाही, असे राज्य शासनाचे मत असेल, अशा नागरिकांच्या मागासवर्गांसाठी, नियुक्ती किंवा पदे यांच्या आरक्षणाची तरतूद करण्याच्या प्रयोजनार्थ शासनाने वेळोवेळी तयार केलेल्या सूच्या, असा आहे ;

(च) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य, असा आहे आणि त्यात अध्यक्षपदस्थ व्यक्ती आणि सदस्य-सचिव यांचा अंतर्भाव होतो ;

(छ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित कलेले, असा आहे ;

(ज) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(झ) "राज्य" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

**राज्य मागासवर्ग आयोग घटित करणे.** **३.** (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग म्हणून ओळखला जाणारा निकाय घटित करील आणि तो निकाय, या अधिनियमान्वये त्याला प्रदान करण्यात आले असतील अशा अधिकारांचा वापर करील आणि नेमून देण्यात आली असतील, अशी कार्ये पार पाडील.

(२) हा आयोग, राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या खालील सदस्यांचा मिळून बनलेला असेल .—

(क) जी, सर्वोच्च न्यायालयाचा किंवा उच्च न्यायालयाचा न्यायाधीश आहे किंवा होती, अशी अध्यक्षपदस्थ व्यक्ती ;

(ख) अनुभवाधिष्ठित संशोधनाचा अनुभव असलेला समाजशास्त्रज्ञ ;

(ग) राज्याच्या सहा महसूल विभागांपैकी प्रत्येक विभागामधून घेतलेला प्रत्येकी एक याप्रमाणे इतर मागासवर्गांशी संबंधित बाबींचे विशेष ज्ञान असलेले सहा सदस्य ;

परंतु, या सदस्यांपैकी एकापेक्षा कमी नसतील, इतके महिला सदस्य असतील आणि इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती यातील प्रत्येकी एक सदस्य असेल ;

(घ) सामाजिक न्याय विभागातील सहसंचालक या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला व जो राज्य शासनाचा अधिकारी आहे किंवा होता, असा सदस्य-सचिव ;

परंतु, सदस्य सचिवाचे नामनिर्देश करण्यापूर्वी राज्य शासन आयोगाशी विचार विनिमय करील.

**अध्यक्षपदस्थ व्यक्ती आणि सदस्य यांचा पदावधी आणि सेवाशर्ती.**

४. (१) प्रत्येक सदस्य त्याने पद धारण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षापर्यंत पद धारण करील.

(२) सदस्याला, कोणत्याही वेळी राज्य शासनाला संबोधून अध्यक्षपदाचा किंवा यथास्थिति सदस्यत्वाचा त्याच्या किंवा तिच्या सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल.

(३) एखादी व्यक्ती जर,—

(क) अमुक्त नादार झाली असेल ;

(ख) राज्य शासनाच्या मते जो नैतिक अध:पात ठरत असेल, अशा अपराधासाठी सिद्धदोष ठरली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल ;

(ग) विकल मनाची असून एखाद्या सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे जाहीर करण्यात आले असेल ;

(घ) काम करण्यास नकार देत असेल किंवा काम करण्यास असमर्थ ठरली असेल ;

(ङ) आयोगाकडून अनुपस्थित राहण्याची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना अनुपस्थित राहिली असेल ; किंवा

(च) त्या व्यक्तीचे त्या पदावर असणे, चालू राहणे, हे मागासवर्गीयांच्या किंवा लोकांच्या दृष्टीने अहितकारक ठरेल अशा रीतीने, तिने अध्यक्षाच्या किंवा सदस्याच्या पदाचा गैरवापर केला असल्याचे शासनाचे मत असेल किंवा अशी व्यक्ती अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून पदावर असण्याचे चालू राहण्यास अन्यथा अपात्र किंवा अयोग्य असल्याचे शासनाचे मत असेल ;

तर राज्य शासन, अशा व्यक्तीला सदस्यपदावरून दूर करील :

परंतु असे की, कोणत्याही पदाधिकाऱ्याला, याबाबतीतले त्याचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, या खंडान्वये पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा (३) अन्वये किंवा अन्यथा रिक्त झालेले पद राज्य शासनाकडून शक्य तितक्या लवकर, नव्याने नामनिर्देशन करून भरण्यात येईल ; आणि अशा रीतीने नामनिर्देशित केलेली व्यक्ती, जर असे पद रिक्त झाले नसते तर त्या पदावरील व्यक्तीने ते जेवढ्या कालावधीसाठी धारण केले असते, त्या उर्वरित कालावधीसाठी ते पद धारण करील ;

परंतु अध्यक्षपदस्थ व्यक्ती नसलेल्या सदस्याचे पद, त्याचा पदावधी संपण्याच्या तारखेपूर्वीच्या सहा महिन्यांत रिक्त झाले, तर ते भरण्यात येणार नाही.

(५) अध्यक्षपदस्थ व्यक्ती व सदस्य यांना देय असलेले मानधन, कोणतेही असल्यास व भत्ते आणि त्याच्या पद धारण करण्याबाबतच्या अन्य अटी व शर्ती, विहित करण्यात येतील त्यानुसार असतील.

**आयोगाचे अधिकारी आणि अन्य कर्मचारी.**

५. (१) राज्य शासन, या अधिनियमाखालील आयोगाची कामे कार्यक्षमतेने पार पाडली जाण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकारी व कर्मचारी आयोगाला पुरवील.

(२) आयोगाच्या प्रयोजनासाठी नियुक्ती करण्यात आलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती, राज्य शासन, वेळोवेळी निश्चित करील, त्यानुसार असतील.

**मानधन, वेतन व भत्ते अनुदानातून देणे.**

६. अध्यक्षपदस्थ व्यक्ती व सदस्य यांना देय असलेले मानधन व भत्ते आणि कलम ५ मध्ये उल्लेखिलेले अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते धरून, प्रशासकीय खर्च व इतर सेवासमाप्ती लाभ, कलम १२च्या पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अनुदानातून भागविण्यात येतील.

**रिक्त पदे, इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही विधिअगाह्य न ठरणे.**

७. आयोगामधील कोणतेही रिक्त पद किंवा प्रकरणाच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाही, अशी आयोग घटित करण्यामधील कोणतीही उणीव किंवा अध्यक्षपदस्थ व्यक्ती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नामनिर्देशनामधील कोणतीही त्रुटी किंवा आयोगाच्या कार्यपद्धतीमधील कोणतीही नियमाबाह्यता याच केवळ कारणावरून, आयोगाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य ठरणार नाही.

**आयोगाने कार्यपद्धती विनियमित करणे.**

८. (१) आयोगाची बैठक, आवश्यक असेल, तर आणि आवश्यक वाटेल तेव्हा अध्यक्षपदस्थ व्यक्ती निश्चित करील, अशा वेळी व अशा ठिकाणी घेण्यात येईल.

(२) आयोग, स्वत: आपली कार्यपद्धती विनियमित करील आणि या प्रयोजनासाठी, हा अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम तयार करील ;

(३) आयोगाचे सर्व आदेश आणि निर्णय, सदस्य-सचिवाकडून किंवा सदस्य-सचिवाने त्याबाबतीत रीतसर प्राधिकृत केलेल्या आयोगाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

## प्रकरण तीन

## आयोगाची कामे आणि अधिकार

**आयोगाची कामे.**

९. (१) (क) नागरिकांच्या कोणत्याही वर्गाचा मागासवर्ग म्हणून सूच्यांमध्ये अंतर्भाव करण्याची विनंती विचारार्थ स्वीकारणे आणि तपासणे ;

(ख) नागरिकांच्या कोणत्याही वर्गाचा, अशा सूच्यांमध्ये कमी किंवा जास्त प्रमाणात अंतर्भाव झाल्याविषयीच्या तक्रारी विचारार्थ स्वीकारणे, त्यांची सुनावणी करणे, त्यांची चौकशी करणे आणि तपासणे व त्यास योग्य वाटेल असा सल्ला राज्य शासनाला देणे ;

(ग) नागरिकांचा मागासवर्ग निश्चित करण्याचे निकष आणि पद्धती यासंबंधी नियतकालिक आढावा घेऊन, त्याबाबत राज्य शासनाकडे शिफारशी करणे ;

(घ) नागरिकांच्या विविध वर्गाच्या बदलत्या सामाजिक-आर्थिक दर्जाविषयीची आधारसामग्री तयार करण्यासाठी नामांकित शैक्षणिक आणि संशोधन संस्थांमार्फत आणि त्यांच्या सहकार्याने नियमित तत्त्वावर चालविले जाणारे अभ्यास आयोजित करवून घेणे ;

(ङ) नागरिकांच्या मागासवर्गाच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीचा नियमितपणे आढावा घेणे ; आणि

(च) विहित करण्यात येतील, अशी इतर कामे पार पाडणे.

ही आयोगाची कामे असतील.

(२) आयोगाने, या कलमान्वये दिलेला सल्ला किंवा केलेली शिफारस राज्य शासनावर सामान्यत: बंधनकारक असेल आणि राज्य शासनाने असा सल्ला किंवा अशी शिफारस पूर्णत: किंवा अंशत: नाकारली किंवा त्यात फेरबदल केले, तर राज्य शासन त्याबाबतची कारणे लेखी नमूद करील.

**आयोगाचे अधिकार.**

१०. आयेगास, कलम ९ च्या पोट-कलम (१) खालील आपली कामे पार पाडीत असताना, विशेषत: पुढील बाबींच्या संदर्भात, एखाद्या वादाची न्यायचौकशी करीत असताना दिवाणी न्यायालयास असतात, ते सर्व अधिकार असतील :—

(क) राज्याच्या कोणत्याही भागातून कोणत्याही व्यक्तीला बोलावणे, उपस्थित राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास भाग पाडणे ;

(ग) शपथपत्रावर पुरावा स्वीकारणे ;

(घ) कोणत्याही न्यायालयातून अथवा कार्यालयातून, कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागविणे ;

(ङ) साक्षीदार आणि दस्तऐवज यांच्या तपासणीसाठी आदेश काढणे ; आणि

(च) विहित करण्यात येईल, अशी अन्य कोणतीही बाब.

**शासनाने सूचीचे नियतकालिक पुनरीक्षण करणे.** ११. (१) जे इतर मागासवर्ग राहिलेले नाहीत, अशा वर्गांना अशा सूच्यांमधून वगळण्यासाठी किंवा नवीन मागासवर्गांचा अशा सूच्यांमध्ये अंतर्भाव करण्यासाठी राज्य शासनाला कोणत्याही वेळी या सूच्यांचे पुनरीक्षण करता येईल आणि शासन, नियत दिवसापासून दहा वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर आणि त्यानंतरच्या दर दहा वर्षांच्या कालावधीनंतर सूच्यांचे पुनरीक्षण करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेले कोणतेही पुनरीक्षण हाती घेताना, शासन आयोगाशी विचारविनिमय करील.

## प्रकरण चार

## वित्तव्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

**शासनाकडून अनुदाने.** १२. (१) राज्य शासन, राज्य विधानमंडळाने या संबंधात कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर, आयोगाला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ वापरण्यासाठी, राज्य शासनाला योग्य वाटेल एवढी रक्कम राज्याच्या एकत्रित निधीमधून अनुदानाच्या स्वरूपात देईल.

(२) आयोग, या अधिनियाखालील कामे पार पाडण्यासाठी, त्यास योग्य वाटेल एवढी रक्कम खर्च करील आणि अशी रक्कम पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या अनुदानातून देय असा खर्च, असल्याचे मानण्यात येईल.

**लेखे व लेखापरीक्षा.** १३. (१) आयोग, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेख ठेवील आणि महालेखापालाशी विचारविनिमय करून, राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(२) आयोगांच्या लेख्यांची लेखापरीक्षा, महालेखापालाकडून, तो विनिर्दिष्ट करील अशा कालांतराने करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेसंबंधात करण्यात आलेला कोणताही खर्च आयोगाकडून महालेखापालाला देय असेल.

(३) महालेखापाल आणि आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासाठी या अधिनियमान्वये त्याने नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती यांना महालेखापालाला शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सर्वसाधारणत: जे अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार असतात. तेच अधिकार, विशेषाधिकार व प्राधिकार, अशा लेखापरीक्षेच्या संबंधात असतील आणि विशेषत: त्याला पुस्तके, लेखे, लेख्यांशी संबंधित प्रमाणके आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे सादर करण्यास सांगण्याचा व आयोगाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा अधिकार असेल.

**वार्षिक अहवाल.** १४. (१) आयोग, प्रत्येक वित्तीय वर्षासाठीचा आपला वार्षिक अहवाल विहित करण्यात येईल, अशा नमुन्यात व अशा वेळी तयार करील व त्यात मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा संपूर्ण तपशील देईल व त्याची एक प्रत राज्य शासनाकडे पाठवील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीस बाध न येता, आयोगास जेव्हा जेव्हा इष्ट वाटेल, तेव्हा तेव्हा विशेषत: सूचींशी संबंधित असलेल्या त्याच्या शिफारशींविषयीचे जादा अहवाल पाठवून देता येतील.

१५. राज्य शासन, अहवाल आणि त्यासोबत कलम ९ व ११ अन्वये आयोगाने दिलेला सल्ला किंवा शिफारशी यांवर करण्यात आलेल्या कारवाईचे ज्ञापन, तसेच असा कोणताही सल्ला किंवा शिफारशी अस्वीकृत केल्या असल्यास, त्याची कारणे आणि लेखापरीक्षा अहवाल, ते मिळाल्यावर शक्य तेवढ्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्याची व्यवस्था करील. **वार्षिक अहवाल आणि लेखापरीक्षा अहवाल विधानमंडळा-समोर ठेवणे.**

## प्रकरण पाच

## संकीर्ण

१८६० चा ४५. १६. आयोगाची अध्यक्षपदस्थ व्यक्ती, सदस्य, अधिकारी व कर्मचारी, भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम २१ च्या अर्थानुसार, लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. **आयोगाची अध्यक्षपदस्थ व्यक्ती, सदस्य अधिकारी व कर्मचारी लोकसेवक असणे.**

१७. (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी, आयोगाशी विचारविनिमय करून, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषत: आणि पूर्ववर्ती अधिकारांच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा नियमांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करता येईल :—

(क) मागासवर्गांच्या सूचीमध्ये जातीचा अंतर्भाव करण्याबाबतचे किंवा सूचीमधून त्यांना काढून टाकण्याबाबतचे निकष व पद्धती ;

(ख) नागरिकांच्या मागासवर्गांच्या सूचीचे पुनरीक्षण करण्याचे प्रस्तावित करण्यासंबंधातील निकष व पद्धती ;

(ग) कलम ४ च्या पोट-कलम (५) अन्वये अध्यक्षपदस्थ व्यक्ती व सदस्य यांना देय असलेले मानधन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) अन्वये अधिकारी व इतर कर्मचारी यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि त्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ;

(घ) कलम १३ च्या पोट-कलम (१) अन्वये वार्षिक लेखा विवरणपत्र ज्या नमुन्यात तयार करावयाचे, तो नमुना ;

(ङ) कलम १४ अन्वये वार्षिक अहवाल ज्या नमुन्यात व ज्यावेळी तयार करावयाचा, तो नमुना व ती वेळ ;

(च) विहित करणे आवश्यक असलेली किंवा विहित करता येईल, अशी इतर कोणतीही बाब.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन वा त्याहून अधिक अधिवेशनात, मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता,

राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या सत्रात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते सत्र किंवा त्याच्या लगतनंतरचे सत्र समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून, तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

**१८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना, कोणतीही अडचण उद्‌भवली, तर राज्य शासनाला अशी अडचण दूर करण्यासाठी त्यांच्या मते आवश्यक किंवा इष्ट असतील व या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, अशा तरतुदी किंवा असे निदेश, **राजपत्रात,** आदेश प्रसिद्ध करून करता येतील ;

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये दिलेला प्रत्येक आदेश, तो देण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ६

# महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य,
  नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : ०२२-२३६३०६९५
  ०२२-२३६३४०४९

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार,
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक.
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : ०२०-२६१२५८०८
  ०२०-२६१२४७५९

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : ०७१२-२५६२६१५

- **सहायक संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार
  शहागंज, गांधी चौकाजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : ०२४०-२३४३३९६
  ०२४०-२३३१४६८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : ०२३१-२६५०४०२

**महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते**